**MHRG120002362024**

<u>नियमित दिवाणी दावा क्र.११/२०२४</u>

प्रदिप नारायण दिवेकर व इतर
वि.
शंकर बाळू दिवेकर व इतर

## <u>निशाणी क्र. ४६ कडील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दिला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता दाखल केला असून त्यात एकूण ४ मिळकतींचे वर्णन केलेले आहे. दावा दाखल झाल्यानंतर वादीला मिळकतींपैकी एक मिळकत प्रतिवादी नं.१ ने जे.सी. फार्म नोंदणीकृत भागीदार संस्था तर्फे राजेश सुंदरलाल बहल यांना विक्री केल्याचे दिसून आले. त्यामुळे गट नं.२१७ जुना सर्वे नं.३९/१ या मिळकतीचा दाव्यात समावेश करुन जे.सी. फार्म नोंदणीकृत भागीदार संस्था तर्फे राजेश सुंदरलाल बहल यांना दाव्यात सामील करण्यासाठी त्याचप्रमाणे अर्जाचे परिच्छेद ५, ६, ७, ८ मध्ये नमूद प्रस्तावीत दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.२ ते ८ यांनी वादीचा अर्ज मान्य आहे असे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ने सदर अर्जावर निशाणी क्र.३४ कडे म्हणणे सादर केले असून त्याने आक्षेप घेतला आहे की, प्रतिवादी क्र.१ ने एकत्रीत कुटूंबाचा पुढारी व व्यवस्थापक म्हणून गट नं.२१७ ची विक्री केली आहे. सदर खरेदीखताच्या वेळेस प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या भाऊ व बहिणींना योग्य तो मोबदला दिला आहे. त्यामुळे सदर मिळकतीवर आज रोजी इतर कोणाचाही अधिकारी राहिलेला नाही. प्रतिवादी क्र.१ ने वादीचे अर्जातील इतर कथन नाकारले असून अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. उभयपक्षाचा युक्तीवाद ऐकला.

४. दावा व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रस्तुत दावा वाटपाकरिता दाखल करण्यात असून प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तावित मिळकत गट

नं.२१७ ही वडिलोपार्जित असल्याचे नाकारलेले नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ने सदर मिळकत विक्री केल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१ याने सदर मिळकत सर्व कुटूंबाच्या हितासाठी विक्री केली काय व त्याचा मोबदला इतर प्रतिवादींना दिला काय या मुद्द्यांवर उभय पक्षकारांनी पुरावा सादर केल्यानंतर योग्य निष्कर्ष काढता येईल. दाव्याची अद्याप सुनावणी सुरू झालेली नसल्याने वादींचा अर्ज मंजूर करून प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादी क्र.१ चे काहीएक नुकसान होणार नाही. दावा दुरूस्तीनंतर प्रतिवादी क्र.१ ला त्याचा बचाव मांडण्यास संधी आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी दिल्यास दाव्याचे स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. करीता वादीचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे या मतास मी पोहोचलो आहे. त्याचवेळी दाव्याच्या सुनावणीस झालेल्या विलंबाबाबत वादीने प्रतिवादी क्र.१ ला रू.५००/– रुपये खर्च देणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. वादीने प्रतिवादी क्र.१ ला रू.५००/– खर्च देण्याच्या अटीवर वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रामध्ये प्रस्तावित दुरुस्ती करावी व दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

GHANSHAM RAMLAL TIWARI
Digitally signed by GHANSHAM RAMLAL TIWARI
Date: 2025.08.06 13:50:04 +0530

(घनःशाम रा.तिवारी)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड

दिनांक : ०५–०८–२०२५